महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार , दि. २९ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३७ किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

१८५७ : क्रांतिकारक मंगल पांडे यांनी बराकपूरच्या छावणीमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या व इथूनच स्वातंत्र्यसंग्रामाला खरी सुरुवात झाली.

१९७९ : भा.द.खेर यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर अमृतपुत्र ही कादंबरी लिहिण्यास प्रारंभ केला.

सेन्सेक्स ७३,५८३.२२ -१,६९०.२३ (२.२५%)
डॉलर ₹ ९४.८६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३८ | २३ |
| दिल्ली | ३४ | २२ |
| मुंबई | ३३ | २५ |
| नागपूर | ३९ | २३ |
| पुणे | ३७ | १७ |

**सुविचार**

विश्वास हा अदृश्य पूल आहे जो आपल्या सध्याच्या अस्तित्वातून आपल्या स्वप्नांच्या पूर्तीपर्यंतचा प्रवास सोप्पा करतो.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२४ संध्या-६:४१

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४९,८७५/- २,४५,०००/-

# होर्मुझ सामुद्रधुनीतून इराण करणार टोल वसूल

## इराणी संसदेत मसूदा सादर

वृत्तसंस्था । तेहरान

**इराणने होर्मुझच्या सामुद्र धूनितून इंधन घेऊन जाणाऱ्या जहाजांकडून आता सागरी सुरक्षेची हमी म्हणून टोल वसूल करण्याचा विचार करत आहे. येथून ये जा करणाऱ्या सर्व जहाजांना आता टोल द्यावा लागणार आहे. जवळपास हा ड्राफ्ट अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात येते. अलजजिरा वृत्तवाहिने याबाबत वृत्त दिले आहे. या वृत्ताने अनेक देश चिंतित आहे. इराणच्या संसदेत होर्मुझबाबत एक ड्राफ्ट आला असून त्यामाध्यमातून ते या मार्गाचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न करत आहे. यापूर्वी इराणने चीनसह काही ठराविक देशांना या मार्गातून जाण्यास परवानगी दिली आहे. मात्र परवानगी शिवाय जाणाऱ्या जहाजांवर ते हल्ले करून इशारा देत हे आहे.**

अमेरीका इराण यांच्यात पाच दिवसांचा युद्ध विराम झाला, असे सांगितले जात असले तरी दोन्ही गट अधून मधून हल्ले करत आहे. इराणचे इंटेलिजन्स मिनिस्टर इस्माईल खतीब हे इस्रायलच्या हल्ल्यात ठार झाले




आहे. इराणने ते स्विकारले आहे. त्यामुळे इस्रायल इराणच्या वरिष्ठ नेते आणि अधिकाऱ्यांना संपवण्याचे सत्र सुरूच आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी इराणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ठार मारण्याचे आदेश दिले आहे. असे एएनआय वृत्त संस्थेने वृत्त दिले आहे. त्यामुळे हे युद्ध अद्याप तरी संपण्याचे चिन्ह दिसत नसून युद्ध विराम काळात दोन्ही बाजूने सैन्य तयारी जोरात सुरू आहे. इराणने १० लाख सैन्य जमवले आहे, तसेच सैन्य भरती ही सुरू केली आहे. दुसरीकडे आखातात अमेरिकेने आपले पॅराट्रुपर

**जगभरातील अनेक देश तेल आणि गॅस वाहतुकीसाठी या मार्गाचा अवलंब करत आहे. त्यांना आता चिंता लागली आहे. आधीच या युध्दामुळे तेल आणि गॅसचा पुरवठा प्रभावित झाला आहे. त्यातच आता इराण हा मार्ग बंद करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे आणखी महागाई होणार आहे.**

आणून ठेवले आहे. जमिनीवरील युद्ध केव्हा ही सुरू होऊ शकते.

तसेच दुसरीकडे ट्रम्प यांनी इराणच्या सैन्य ठिकाणांना लक्ष केल्याचे सांगून लष्करी दृष्ट्या इराण कुमकुवत झाला आहे, असा दावा त्यांनी केला आहे. मात्र इराण इतके दिवस झाले तरी इराण हार मान्यास तयार नसल्याने ट्रम्प यांच्या दाव्यावर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे. तसेच अमेरिकेच्या रक्षा विभागाने २०० अरब डॉलर इतका निधी सरकारकडे मागितला आहे. त्यासाठी अम त्यामुळे हे युद्ध तिसऱ्या आठोड्यात ही सुरूच आहे. आणि ते पुढे ही सुरूच राहील असे दिसते.

# भोंदू अशोक खरातकडे जाणारे ते ४० आमदार कोण?

## संजय राऊतांच्या सवालाने खळबळ

वृत्तसंस्था । मुंबई

**अशोक खरात प्रकरणावर भाष्य करताना संजय राऊत यांनी ४० आमदारांची नावे जाहीर करण्याची मागणी केली आहे. ज्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**



नाशिकमधील भोंदू बाबा प्रकरणात अनेक राजकीय नेत्यांचा संबंध असल्याचा आरोप केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून या प्रकरणामुळे राजकीय वातावरण देखील चांगलेच तापले आहे. अशातच उबाठा गटाचे नेते खासदार संजय राऊतांनी मोठी मागणी करत काही सवाल उपस्थित केले आहेत.

नाशिकमधील भोंदू अशोक खरातला विमानांची सोय करून देणारे सरकारमधील ते बडे नेते कोण? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. तसेच खरातकडे ४० आमदार जात असल्याचा दावा खुद्द दीपक केसरकर यांनीच केला आहे, त्यामुळे आता त्या ४० आमदारांची नावे जाहीर करण्यात यावीत, अशी मागणी संजय राऊतांनी केली आहे. खरात दिल्लीमध्ये जात कोणाला भेटत होता हे जर पोलिस तपासात निष्पन्न झाले असेल तर ते समोर आले पाहिजे. अशोक खरात यांचा वावर सर्वत्र होता. सरकारने त्याला

संजय राऊत म्हणाले, सत्ताधारी आमदार दीपक केसरकर म्हणतात की मला एकट्यालाच का टार्गेट करता आहात. खरातकडे ४० आमदार जात होते. हे ४० आमदार कोण? हे पुढे आले पाहिजे, खरातसाठी विमानांची सोय करणारे सरकारमधील कोण लोकं होते हे जाहीर केले पाहिजे, अशी मागणीही संजय राऊत यांनी केली आहे. दि.२९ मार्चला पोलीस कोठडीची मुदत संपणार आहे. त्यामुळे या प्रकरणात अशोक खरातसोबत राजकीय नेत्यांचे लागेबांधे होते का? हा महत्वाचा प्रश्न विचारला जात आहे. या प्रकरणाचा सखोल तपास एसआयटी करत असून, दि. २९ मार्चला अशोक खरातची पोलीस कोठडीची मुदत संपत आहे. त्यामुळे उद्या कोर्टात काय घडते याकडे लक्ष असणार आहे.

राजमान्यता दिली होती. ज्यांनी त्यांना राजमान्यता दिली ती लोकं फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात आजही आहेत, असा दावा संजय राऊतांनी केला आहे. फडणवीसांनी त्यावर बोलावे, असे देखील राऊत म्हणाले आहेत. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, एखाद्या समाजाच्या मंदिरासाठी मंत्री जर वेगळी व्यवस्था करत असतील तर त्यावर आम्ही टीका करणार नाही. नरेंद्र मोदी यांनी जी चूक केली ती देवेंद्र फडणवीयांनी करू नये. त्यांनी विरोधी पक्षातील नेत्यांनासोबत घेत यावर बैठक घ्यावी. (पान २ वर)

## थोडक्यात




### भोंदूबाबा ऋषिकेश वैद्यच्या पुणे पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**पुणे ।** नाशिकमधील भोंदुबाबा अशोक खरात याने महिलांवरील अत्याचाराचे प्रकरण गाजत असतानाच आपण महादेवाचा अवतार असल्याचे सांगून महिलेवर अत्याचार करणाऱ्या ऋषिकेश वैद्य या भोंदुबाबाचे बिंग फुटले होते. एका महिलेच्या फिर्यादीनंतर पोलीस त्याचा शोध घेत होते. गुन्हा दाखल झाल्याचे समजताच तो पसार झाला होता. मांजरी पोलिसांनी त्याचा शोध घेऊन त्याला पिंपरी परिसरातून अटक केली आहे. अशोक खरात याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पुण्यातील महिलेने हिंमत करुन हा सर्व प्रकार आपल्या पतीला सांगितला. पिडित महिला ही मुळची पुण्यातील आहे. वसई व पुणे पोलिसांनी ऋषिकेश वैद्य याचा शोध घेत होते.

### भारत–नेपाळ संबंधांना नवी गती

**नेपाळ ।** नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन शाह यांनी भारतासोबत संबंध अधिक मजबूत करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या होत्या. त्या शुभेच्छांसाठी बालेन शाह यांनी आभार मानत, भारतासोबत मिळून काम करण्याबाबत उत्सुकता व्यक्त केली आहे.



### तीन महिन्यांनी एलपीजी गॅस बंद होणार?

**दिल्ली ।** आखातात युद्धाचा भडका उडाला असून, युद्धाची झळ भारतासह सर्व देशांना बसली आहे. गेल्या काही दिवसांपासून एलपीजी गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा जाणवत असून, सर्वसामान्य तसेच व्यावसायिकांचे हाल होत आहेत. येत्या काही दिवसांमध्ये कदाचित परिस्थिती आणखी भीषण बनू शकते, अशी चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वक्तव्याने भुवया उंचावल्या आहेत. तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी गॅसचा पुरवठा बंद होऊ शकतो, असे संकेत छगन भुजबळ यांनी दिले आहेत. ते शनिवारी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

# शपथ घेतल्यावर २४ तासांत मोठा निर्णय! बालेन शाह यांनी माजी पंतप्रधान ओलींना पाठवलं तुरुंगात

वृत्तसंस्था । नेपाळ

**नेपाळच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. नव्याने पंतप्रधानपदाची शपथ घेतलेल्या बालेन शाह यांनी अवघ्या २४ तासांत कठोर पाऊल उचलत माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना अटक करण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईमुळे नेपाळच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.**

ही कारवाई जेन-जी आंदोलनदरम्यान झालेल्या हिंसाचाराशी संबंधित आहे. या आंदोलनात झालेल्या गंभीर



घटनांबाबत ओली आणि लेखक यांच्यावर निष्काळजीपणा आणि जबाबदारी न पाळल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात दोषी ठरल्यास त्यांना १५ वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते. या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचाराच्या चौकशीसाठी गौरीबहादूर कार्की यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन करण्यात आला होता. या आयोगाच्या अहवालात ८ सप्टेंबर रोजी झालेल्या घटनेत प्रशासनाने योग्य पावले उचलली नाहीत, असे नमूद करण्यात आले. विशेषतः आंदोलकांच्या मृत्यूसाठी वरिष्ठ नेत्यांची भूमिका जबाबदार असल्याचे सांगण्यात आले आहे. या हिंसाचारात एकूण ७७ (पान २ वर)

# पुणेकर घामाघूम! पारा ४० पार

वृत्तसंस्था । पुणे

शहरासह जिल्ह्यात उष्णतेच्या पाऱ्याने चाळीशी पार करत आज हंगामातील उच्चांक नोंदविला आहे. लोहगाव येथे सर्वाधिक ४०.४ तर पुरंदर येथे ४०.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, शुक्रवारी (दि. २७) दुपारपर्यंत उन्हाच्या झळांमुळे अंगाची लाहीलाही झाली. त्यामुळे उकाडा वाढलेला होता. दुपारनंतर ढगाळ वातावरण आणि जिल्ह्यातील काही परिसरात पावसाच्या हलक्या सरी पडल्याने वातावरणात बदलले. गेल्या २४ तासांत शहर परिसरात एक तर जिल्ह्यात दीड अंशाने कमाल तापमानात वाढ झाली. (पान २ वर)

# आठ बड्या आयएएस अधिकाऱ्यांची बदली

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाची चर्चा असून, एसआयटीकडून सखोल चौकशी केली जात आहे. अशातच एक मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्राच्या प्रशासनात मोठा उलटफेर झाला आहे. प्रशासनातील तब्बल ८ आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.**

या बदल्यावरुन अशोक खरात प्रकरणाचे प्रशासनातही पडसाद उमटताना दिसत आहेत. भोंदू खरातशी काही सरकारी अधिकाऱ्यांचेही संबंध असल्याचे तपासात उघड झाले आहे. काही दिवसांपूर्वी खरातशी संबंध असल्याचा ठपका ठेवत उपजिल्हाधिकारी अभिजीत

## • अभिजीत भांडे पाटील यांची उचलबांगडी

**मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली. त्यानंतर त्यांना मंत्रालयातील महसूल व वन विभागात तात्काळ रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले.**

भांडे पाटील यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.

आता ज्या ८ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये राज्य प्रशासनातील जिल्हाधिकारी आणि आयुक्त पदावरील बड्या अधिकाऱ्यांचे नाव आहे. एम. देवेंद्र सिंग यांची बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे सहआयुक्त म्हणून बदली झाली आहे. डॉ. मैनक घोष जिल्हा परिषद, धाराशिव, यांची सांगली येथे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती तर प्रियंवदा म्हाडुळकर यांची जिल्हा परिषद, धाराशिव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे.

अशोक काकडे जिल्हाधिकारी, सांगली यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ (एमएआयडीसी), मुंबई म्हणून नियुक्ती, राहुल रेखवार यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे सदस्य सचिव म्हणून बदली तर श्वेता सिंघल विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांची व्यवस्थापकीय संचालक, महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन (पान २ वर)

# पुणे विद्यापीठात ६ कोटींचा डल्ला?

## कुलगुरूंचे खळबळजनक विधान

वृत्तसंस्था । पुणे

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत (सिनेट) शुक्रवारी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून अभूतपूर्व गदारोळ झाला. आदिवासी विभागाच्या निविदेत सहा कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा आरोप करत सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. याचे गांभीर्य ओळखून कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांना तातडीने सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय जाहीर केला.**

तसेच, २०१७ ते २०२४ या कालखंडातील विद्यापीठाच्या कामकाजाचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याची घोषणाही त्यांनी केली. अर्थसंकल्पीय अधिसभेला सुरुवात होताच सदस्य आक्रमक झाले. कुलगुरू अहवाल वाचन करणार इतक्यात सदस्यांनी आदिवासी विभागातील कथित



गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केला.

डॉ. अभ्यंकर यांच्या निलंबनाची आणि संपूर्ण चौकशीची मागणी करत सदस्यांनी सभात्याग करण्याचा इशारा दिला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून कुलगुरूंनी दहा मिनिटांसाठी सभा स्थगित केली. त्यानंतरच्या चर्चेअंती डॉ. अभ्यंकर यांच्यावर कारवाईचा निर्णय घेण्यात आला. यावेळी विनायक आंबेकर, सचिन गोरडे, अपूर्व हिरे यांच्यासह अनेक सदस्यांनी प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

विद्यापीठाला आता पूर्णवेळ परीक्षा संचालक मिळणार आहे. या पदासाठी येत्या ७ एप्रिल रोजी मुलाखती होणार आहेत. तसेच अधिष्ठातापदासाठी एप्रिल महिन्याच्या अखेरीस मुलाखती घेण्यात (पान २ वर)

### कुलगुरूंचा अखेर निर्णय

विशेष म्हणजे, हे निर्णय जाहीर करताना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी काहीसे द्विधा मनस्थितीत दिसले. सदस्यांच्या आग्रहामुळे त्यांनी दोन्ही निर्णय जाहीर केले. यावेळी बोलताना, आता निर्णय घेतले नाहीत, तर मला घरी जावे लागेल, असे विधान कुलगुरूंनी केल्याने अधिसभेत शांतता पसरली. विद्यापीठाच्या गेल्या सात वर्षांच्या आर्थिक व्यवहारांची फॉरेन्सिक ऑडिट त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यासाठी एका महिन्यात निविदा काढली जाणार असल्याचे कुलगुरुंनी सांगितले.

# वैयक्तिक कारणांपासून सुरू झालेला माज दोन ओळींच्या राजीनाम्यावर उतरला

## शरद पवार गटाच्या महिला नेत्याची चाकणकरांवर टीका

वृत्तसंस्था । मुंबई

**नाशिकमधील अशोक खरात प्रकरणामुळे रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद गमवावे लागले आहे. यानंतर रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा देखील राजीनामा दिला.**

रुपाली चाकणकर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्र पाठवून राजीनामा स्वीकारण्याची विनंती केली. अशोक खरात प्रकरणानंतर मोठ्या प्रमाणात रूपाली चाकणकर यांच्या टीका केली जात आहे. विरोधकांकडूनही त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला होता.अखेर त्यांनी महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिल्यानंतर शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी चाकणकरांवर निशाणा साधला आहे. राजीनामा दिल्याचे पत्र रुपाली चाकणकरांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरून शेअर केले आहे. यासोबत त्यांनी एक ट्वीट केले आहे. या ट्वीटमध्ये त्या म्हणाल्या, खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्या आर्थिक व्यवहारात, त्याच्या गैरकृत्यात दुरान्वये संबंध नाही, आजही तीच स्पष्ट व ठाम भूमिका आहे. तपासादरम्यान या सर्व बाबी निष्पन्न होतीलच. खोटे, असत्य व कुठलाही पुरावा नसताना जे आरोप माध्यमांमधून होत आहेत, ते वेदनादायक आहे. सत्य प्रखरतेने सिद्ध होईलच. हा तपास पारदर्शकपणे व निष्पक्षपणे व्हावा, अशी मागणी मी यापूर्वीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,पोलिस महासंचालक (पान २ वर)

## संपादकीय

### गुंतागुंतीचे समीकरण

गेल्या पाच दिवसांत ट्रम्प यांनी वेगवेगळी पाच परस्परविरोधी विधाने करून त्यांच्या मनात किती गोंधळ आहे हे दाखवून दिले आहे. इराण युद्धाच्या दलदलीत ट्रम्प पूर्ण माखले गेले असून, त्यातून बाहेर पडताना त्यांचीच कोंडी झाली आहे. इस्रायलच्या नादी लागून अमेरिकेने इराणवर हल्ले केले. परंतु युद्ध सुरू होऊन आता महिना होत आला, तरी इराण शरण जायला तयार नाही. महत्त्वाचे नेत्यांना ठार केले, म्हणजे इराण दाती तृण धरून शरण येईल, ही अपेक्षा लोप पावली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर आज एक गुंतागुंतीचे आणि धोकादायक समीकरण उभे ठाकले आहे. इराणसोबतचा वाढता संघर्ष केवळ लष्करी प्रश्न राहिलेला नाही, तर तो आर्थिक, सामरिक आणि राजकीय स्तरांवर अमेरिकेला वेढून टाकणारा दलदल बनला आहे. या दलदलीतून बाहेर पडणे ट्रम्प यांच्यासाठी सोपे नाही आणि त्यांनी उचललेले प्रत्येक पाऊल पुढील परिस्थिती अधिकच क्लिष्ट करू शकते. प्रथम, ट्रम्प यांच्यासमोर उपलब्ध पर्यायांचा विचार केला तर ते अत्यंत मर्यादित आहेत. एक पर्याय म्हणजे संघर्ष अधिक तीव्र करणे, इराणच्या महत्त्वाच्या तेल केंद्रांवर हल्ले करणे किंवा होर्मुझ सामुद्रधुनी खुली ठेवण्यासाठी लष्करी कारवाई तीव्र करणे, परंतु यापैकी कोणताही मार्ग निवडल्यास इराणकडून प्रतिउत्तर म्हणून ड्रोन, क्षेपणास्त्र, सायबर हल्ले किंवा प्रॉक्सी गटांच्या माध्यमातून प्रादेशिक अस्थिरता वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर आज एक गुंतागुंतीचे आणि धोकादायक समीकरण उभे ठाकले आहे. इराणसोबतचा वाढता संघर्ष केवळ लष्करी प्रश्न राहिलेला नाही, तर तो आर्थिक, सामरिक आणि राजकीय स्तरांवर अमेरिकेला वेढून टाकणारा ङ्गदलदलफ बनला आहे. या दलदलीतून बाहेर पडणे ट्रम्प यांच्यासाठी सोपे नाही आणि त्यांनी उचललेले प्रत्येक पाऊल पुढील परिस्थिती अधिकच क्लिष्ट करू शकते. प्रथम, ट्रम्प यांच्यासमोर एक पर्याय म्हणजे संघर्ष अधिक तीव्र करणे, इराणच्या महत्त्वाच्या तेल केंद्रांवर हल्ले करणे किंवा होर्मुझ सामुद्रधुनी खुली ठेवण्यासाठी लष्करी कारवाई तीव्र करणे; परंतु यापैकी कोणताही मार्ग निवडल्यास इराणकडून प्रतिउत्तर म्हणून ड्रोन, क्षेपणास्त्र, सायबर हल्ले किंवा प्रॉक्सी गटांच्या माध्यमातून प्रादेशिक अस्थिरता वाढण्याची शक्यता आहे. यामुळे केवळ मध्यपूर्वच नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेलाही मोठा फटका बसू शकतो. दुसरा पर्याय म्हणजे मर्यादित लष्करी कारवाई करतानाच कूटनीतिक मार्ग खुले ठेवणे. ओमानसारख्या मध्यस्थांच्या साहाय्याने गुप्त वाटाघाटी सुरू करणे, निर्बंधांमध्ये काही शिथिलता देण्याचा विचार करणे आणि इराणला सुरक्षिततेची हमी देण्याचा प्रयत्न करणे, हा तुलनेने कमी जोखमीचा मार्ग ठरू शकतो. तथापि, इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांनी मांडलेल्या अटी, अणु कार्यक्रमावरील अधिकारांची मान्यता, युद्ध भरपाई आणि भविष्यातील हल्ल्यांविरुद्ध हमी या अमेरिकेसाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत कठीण आहेत. तिसरा आणि कदाचित सर्वात व्यवहार्य पर्याय म्हणजे रणनीतिक माघार. म्हणजेच, युद्धातील उद्दिष्टं साध्य झाल्याची घोषणा करून संघर्षातून सन्मानजनक बाहेर पडणे. हा मार्ग निवडल्यास अमेरिकेच्या प्रतिमेला काही प्रमाणात धक्का बसू शकतो; परंतु दीर्घकालीन दृष्टीने तो अधिक नुकसान टाळू शकतो. इतिहासावर नजर टाकल्यास दीर्घकाळ चाललेली युद्धं बहुतेक वेळा अपेक्षित परिणाम देत नाहीत. ट्रम्प यांच्यासारख्या एकाधिकारशाही मानणाऱ्या व्यक्तीला माघार मान्य आहे का? ट्रम्प यांनी गेल्या चार दिवसांत युद्ध थांबवण्याची केलेली भाषा, चर्चेचा मार्ग खुला केलेले वक्तव्य आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग मोकळा केला नाही, तर बॉंबहल्ले करण्याची दिलेली धमकी, यामुळे ट्रम्प यांच्यापुढील आव्हाने तितकीच गंभीर आहेत.

# ३०० गाळेधारकांना नोटिसा; वरणगाव पालिकेचा दणका

## थकित भाडे भरा, जागा रिकाम्या करा; अन्यथा थेट कारवाईचा इशारा

प्रतिनिधी । वरणगाव

**शहरातील शासकीय जागांवर व्यवसाय करणाऱ्या गाळेधारकांवर नगरपालिकेने अखेर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. थकीत भाडे तात्काळ भरणे आणि मुदत संपलेल्या जागा रिकाम्या करण्याचे आदेश देत सुमारे ३०० व्यावसायिकांना नोटिसा बजावण्यात आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.**




ग्रामपंचायत कार्यकाळात शहरात उभारण्यात आलेल्या व्यापारी संकुलांतील गाळे भाडेतत्त्वावर देण्यात आले होते. मात्र, कालांतराने अनेक करारांची मुदत संपूनही गाळेधारकांनी जागा कायम ठेवली असून मोठ्या प्रमाणात भाडे थकीत राहिल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे. नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर नव्या नियमांनुसार या प्रकरणाची तपासणी करण्यात आली आणि त्यानंतर ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

रेल्वे स्थानकापासून भोगावती नदीपर्यंतच्या प्रमुख मार्गालगत असलेल्या दुकानांवर या कारवाईचा विशेष फोकस असून, शहरातील प्रमुख व्यापारी पट्टा यामध्ये येत आहे.

नगरपालिकेकडून देण्यात आलेल्या नोटिशीनुसार, संबंधित गाळेधारकांनी नोटीस मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत थकीत रक्कम भरून जागा रिकामी करणे बंधनकारक आहे. आदेशाचे पालन न केल्यास पालिका थेट कारवाई करून गाळे ताब्यात घेणार असून, त्या कारवाईचा खर्चही संबंधितांकडून वसूल करण्यात येणार आहे.

**व्यापाऱ्यांचा तीव्र विरोध**

या निर्णयामुळे शहरातील व्यापारी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. व्यापारी संघटनेने याला जोरदार विरोध दर्शवत हा केवळ ३०० गाळेधारकांचा प्रश्न नसून त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा मुद्दा असल्याचे स्पष्ट केले आहे. अचानक अशा प्रकारे नोटिसा देऊन जागा रिकामी करण्यास सांगणे अन्यायकारक आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीत व्यावसायिक आधीच अडचणीत आहेत.

आम्ही सर्व व्यापाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असे संघटनेचे अध्यक्ष विलास मुळे यांनी सांगितले.

**पालिकेची भूमिका ठाम**

दरम्यान, पालिका प्रशासनानेही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ग्रामपंचायत काळात करण्यात आलेल्या करारांची मुदत संपली असून अनेकांकडून भाडे थकीत आहे. त्यामुळे नियमांनुसार वसुली व नूतनीकरणासाठी नोटिसा देणे आवश्यक होते, असे उपमुख्य अधिकारी रशीद नौरंगाबादी यांनी सांगितले.

# मनपात भाजपाकडून ५ स्वीकृत सदस्य निश्चित

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवलेल्या भाजपाकडून स्वीकृत नगरसेवकपदी पाच जणांची नावे निश्चित करण्यात आली आहेत.**

गुलशन उदासी, जयेश वावदे, ऋषिकेश वराडे, नरेश चौधरी आणि ओमप्रकाश खंडेलवाल या उमेदवारांनी शुक्रवारी दुपारी नगरसचिवांकडे आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. महापालिका निवडणुकीत ५० जागा जिंकत भाजपाने एकहाती सत्ता मिळवली आहे. निवडणुकीदरम्यान अनेक इच्छुकांना संधी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, सर्वांना थेट उमेदवारी देणे शक्य नसल्याने पक्षश्रेष्ठींनी स्वीकृत सदस्यपदाच्या माध्यमातून काहींना संधी देण्याचा मार्ग निवडला.

अंतिम मुदतीच्या दिवशी पक्षाने पाच नावांवर शिक्कामोर्तब करत पहिला टप्पा पूर्ण केला. स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने शहरात याकडे विशेष लक्ष लागले होते.

दरम्यान, स्वीकृत

**उद्या अंतिम निवड**

एमआयएमकडून अन्सारी मो. जावीद मो. शाबान व राष्ट्रवादी, शिवसेना आघाडीकडून तुषार प्रकाश जाधव या उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून स्वीकृत सदस्यांच्या अंतिम निवडीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपाचे उमदेवारी अर्ज दाखल करतेवेळी महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, अल्पा अग्रवाल, प्रतिभा चौधरी, भगवान गवळी, किरण कुलेवार, विक्की परदेशी, भिकन वराडे, युवराज चौधरी आदी उपस्थित होते.

नगरसेवकांची अंतिम निवड दि. ३० मार्च रोजी महापौरांच्या उपस्थितीत होणार आहे.

# चोरीस गेलेले पैसे वृद्धास मिळवून दिले

## पाचोरा पोलिसांची तत्पर कामगिरी

प्रतिनिधी । पाचोरा

**वडगाव खुर्द ता. पाचोरा येथील ७० वर्षीय वृद्धाच्या खिशातून दि. २६ मार्च रोजी चोरीस गेलेले १३ हजार ४०० रुपये पोलिसांनी संशयिताकडून जप्त करून ते वृद्धास परत केले.**



पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार वडगाव खुर्द येथील श्रावण ताराचंद पाटील हे पाचोरा येथील आपले काम आटोपून दुपारी सव्वातीनच्या सुमारास पाचोरा बसस्थानकावर आले. बसमध्ये चढत असताना त्यांच्या खिशातून १३ हजार ४०० रुपये अज्ञातांनी लंपास केले. श्रावण पाटील यांनी पोलिसात तक्रार दिल्यानंतर पोलिस निरीक्षक राहुलकुमार पवार यांनी चोरट्यांच्या शोधासाठी स्वतंत्र पथक तयार केले.

या पथकाने तांत्रिक बाबी संकलित करून व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयिताला शोधून काढले. त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता त्याने पैसे चोरल्याची कबुली दिली. आरोपी कडून पोलिसांनी १३ हजार ४०० रुपये ताब्यात घेऊन ती रक्कम पोलिस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या हस्ते वृद्ध शेतकरी श्रावण पाटील यांना रक्कम परत केली. पोलिसांच्या तत्पर कामगिरीचे कौतुक होत आहे.

# पाचोरा बस स्टँडवर चोरी करणारी टोळी जेरबंद

प्रतिनिधी । पाचोरा

**पाचोरा बसस्थानक परिसरात चोरी करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश करत दोन आरोपींना अटक केली आहे.**



या आरोपींवर विविध ठिकाणी गुन्हे दाखल असून त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याची कारवाई करण्यात आली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ मार्च २०२६ रोजी पाचोरा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सुमारे ५० हजार रुपयांची रोकड चोरी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पाचोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी संशयितांची माहिती मिळवून सापळा रचला. त्यानंतर आरोपी अंकुश देवचंद बोरसे (वय १९) व त्याच्या साथीदारास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी पाचोरा बस स्थानक परिसरात चोरी केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींवर यापूर्वीही विविध गुन्हे दाखल असून त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश होते. तरीही ते पाचोरा परिसरात येऊन चोरी करत असल्याचे उघड झाले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पाचोरा पोलिस ठाण्याच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू असून आरोपींना न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## पान १ वरून

पान १ वरून

**भोंदू अशोक खरातांकडे......**

विरोधी पक्षनेता नेमावा तरच टीम महाराष्ट्र तयार होईल, असेही राऊत यावेळी बोलताना म्हणाले. अशोक खरातसोबत शिवसेना नेते मंत्री दीपक केसरकर यांचे फोटो व्हायरल झाले आहेत. त्यांच्यावर देखील विरोधकांनी आरोप केले आहेत. त्यामुळे या प्रकरणाला घेऊन खरातला राजकीय नेत्यांचा वरदहस्त होता का? असा प्रश्न विचारला जात आहे. संजय राऊतांनी माध्यमांशी बोलताना दीपक केसरांचे नाव घेत त्यांनी केलेल्या विधानावर विमानांची सोय करणारे सरकारमधील कोण लोकं होते हे जाहीर केले पाहिजे, अशी मागणी केली आहे.

**शपथ घेतल्यावर २४ तासांत......**

लोकांचा मृत्यू झाला होता, तर मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाले. अंदाजे ८५ अब्ज नेपाळी रुपयांची हानी झाल्याचेही समोर आले आहे. याशिवाय, आंदोलकांवर कठोर कारवाईचे आदेश देणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले गेले आहे. दरम्यान, केपी शर्मा ओली यांनी या कारवाईवर आक्षेप घेतला आहे. त्यांनी हे सर्व राजकीय सूडबुद्धीने केले जात असल्याचा आरोप केला असून, या निर्णयाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे. त्यांनी आपल्या बचावात सांगितले की, आंदोलनादरम्यान त्यांनी सुरक्षायंत्रणेला जीवित आणि मालमत्तेचे नुकसान कमी करण्याचे निर्देश दिले होते. दुसरीकडे, पंतप्रधान बालेन शाह यांनी आयोगाच्या शिफारशींवर आधारित ही कारवाई केल्याचे स्पष्ट केले आहे. जेन-जी आंदोलनशी त्यांचा जवळचा संबंध असल्याचे मानले जाते आणि या आंदोलनातील पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांनी हे कठोर पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. या घडामोडींमुळे नेपाळच्या राजकारणात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नव्या सरकारचा कडक आणि निर्णायक दृष्टिकोन यामुळे स्पष्ट झाला असून, पुढील काळात आणखी मोठे निर्णय घेतले जाऊ शकतात.

**आठ बड्या आयएएस......**

लिमिटेड, मुंबई म्हणून नियुक्ती रुबल प्रखेर अग्रवाल व्यवस्थापकीय संचालक, महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांची विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई म्हणून बदली झाली आहे.

**पुणे विद्यापीठात ६......**

येणार आहे. तसेच पुणे विद्यापीठात प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू झाली असून, शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी १११ प्राध्यापक पदाची भरती होणार असल्याचे कुलगुरु डॉ. गोसावी यांनी सांगितले. काय आहे प्रकरण? - राज्य सरकार आदिवासी विभागाने डाटा ॲनालिटिक्स सेंटर उभारण्याचे काम विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाला दिले होते. या प्रकल्पात साधनसामग्रीची किंमत अव्वाच्या सव्वा दाखवून ६ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा ठपका डॉ. अभ्यंकर यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याच प्रकरणी आता पाच सदस्यीय उच्चस्तरीय समिती चौकशी करणार आहे. या समितीत माजी न्यायमूर्ती, सनदी लेखापाल आणि अधिसभा सदस्यांचा समावेश असेल.

**वैयक्तिक कारणांपासून......**

यांच्याकडे केली आहे. आज सकाळी फोनद्वारे ना. सुनेत्रावहिनी पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार मी माझ्या राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे, असेही त्यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे. रोहिणी खडसे ट्वीट - वैयक्तिक कारणांपासून सुरू झालेला माज २ ओळींच्या राजीनाम्यावर उतरला, असे रोहिणी खडसे यांनी रूपाली चाकणकर यांना सुनावले आहे. तर अंजली दमानिया यांनी देखील कर्माचे फळ चुकत नाही. ह्याच जन्मात भोगावं लागतं, असा निशाणा चाकणकरांवर साधला आहे.

**पुणेकर घामाघूम!......**

परिणामी उष्णतेच्या पाऱ्याने उच्चांक गाठत चाळीशीच्या पुढे मजल मारली आहे. मार्च महिन्याच्या अखेरीस वाढत्या तापमानामुळे उन्हाचा चटका आणि उकाडा नागरिकांना हैराण करत आहे. लोहगाव आणि पुरंदर पाठोपाठ शिवाजीनगर, पाषाण, तळेगाव, कोरेगाव पार्क, मगरपट्टा परिसरात पारा ३८ अंशाच्या पुढे नोंदविला. शुक्रवारी सकाळपासून शहरातील हवामान कोरडे होते. दुपारी बारानंतर उन्हाच्या झळा अंगाची लाहीलाही करत असून, उकाड्याने पुणेकर घामाघूम झाले. दुपारी दोननंतर वातावरणातील बदलामुळे ऊन आणि ढगाळ वातावरणाचा लपंडाव सुरू झाला. दुपारी जिल्ह्याच्या काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाच्या हलक्या सरी पडल्यामुळे उकाड्यापासून काही क्षणभर दिलासा मिळाला होता.

# चिनोदा परिसरात केळी बागेचे शेतकऱ्यांकडून संगोपन

प्रतिनिधी । तळोदा

**तळोदा तालुक्यातील चिनोदा परिसरात मोठ्या प्रमाणावर केळीची लागवड करण्यात आली असून सध्या परिसरात कडक उन्हाचा तडाखा जाणवू लागल्याने केळीच्या घडाला कडक ऊन्हाचा प्रादुर्भाव होऊन केळीचा घड खराब होऊ नये म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून चिनोदा येथील केळी उत्पादक शेतकरी हिरालाल रोहिदास पाटील या शेतकऱ्याने केळी लागवड केलेल्या क्षेत्रातील केळीच्या घडावर मोठ्या क्रॉप कव्हर पिशवीने केळीच्या घडाला झाकून संगोपन केले आहे.**

सद्यस्थितीत केळी पिकाची फळधारणा सुरू झाली असून केळीच्या फळाला कडक ऊन्हाचे चटके बसून केळीचा घड खराब होत असतात. अशा वेळीला व्यापारी कवडीमोल दराने खरेदी करतात. म्हणून शेतकऱ्यांकडून आता केळीच्या घडाला ऊन्हाचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी मोठ्या क्रॉप कव्हर पिशवीने झाकण्यात आले असून ऊन्हामुळे केळीच्या फळावर प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते म्हणून केळी उत्पादक शेतकऱ्याकडून केळी घडावर ऊन्हाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मोठी क्रॉप कव्हर पिशवी झाकून संगोपन करण्यात येत असल्याचे चित्र चिनोदा परिसरात पहावयास मिळत आहे.

# गलंगी येथे अखंड हरिनाम कीर्तन सोहळा

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गलंगी येथे संत श्रेष्ठ ज्ञानराज माऊली व संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या कृपाप्रसादाने ह.प.भ. कुमावत महाराज यांच्या आशीर्वादाने दि.२६मार्च ते २एप्रिलदरम्यान कीर्तन सप्ताह संपन्न होत आहे.**




दैनंदिन रूपरेषा अशी की, काकडा आरती सकाळी ५.३० ते ६३०वाजता, प्रवचन दुपारी ४ ते ५ वाजता, हरिपाठ सायंकाळी ५ ते ६ वाजता, कीर्तन रात्री ८:३० ते १०:३० वाजता ह.भ.प. भूषण महाराज वाडेकर, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज मालेगाव, विशाल महाराज डांगरी, रवींद्र महाराज गोराणे, योगेश महाराज सटाणा, मोहन महाराज अजंड, प्रविण महाराज हाताने यांचे कीर्तनाचा कार्यक्रम होत आहेत. तर ह.भ.प.योगेश महाराज वरझडी यांचे सकाळी नऊ ते ११ वा. काल्याचे कीर्तन होईल यांच्यासोबत मृदुंगाचार्य,विणेकरी, हार्मोनियम गायनाचार्य तसेच अनेर परिसरातील ग्रामस्थ भजनी मंडळ, जय भोले ग्रुप, महर्षी वाल्मिक क्रिकेट टीम, रामराज्य मित्र मंडळ, वैष्णवी मेळावा मित्र मंडळ, ऋषिराज मित्र मंडळ गलंगी यांचेही सहकार्य लाभत आहे.

दि. २ एप्रिल रोजी नगर प्रदक्षिणा व दिंडी सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी परिसरातील ग्रामस्थांनी महाप्रसादाच्या लाभ घ्यावा, असे आवान गलंगी येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# समाजाला मार्गदर्शन करणे ही आदर्श शिक्षकाची भूमिका

## समृद्ध जीवनाचे मानसशास्त्र ग्रंथ प्रकाशन सोहळ्याप्रसंगी डॉ.हिंमतराव नरके यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । धुळे

**केवळ औपचारिक अभ्यासक्रम शिकविणे एवढेच शिक्षकाचे कार्य नसून अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि लेखनाद्वारे समाजाला मार्गदर्शन करणे ही आदर्श शिक्षकाची भूमिका असल्याचे मत डॉ. हिंमतराव नरके यांनी व्यक्त केले. जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचालित, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन प्रा. डॉ. शशिकांत खलाणे यांच्या समृद्ध जीवनाचे मानसशास्त्र समृद्ध जीवनाचे मानसशास्त्र या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.**



या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील सेवानिवृत्त मानसशास्त्र विभाग प्रमुख मेजर प्राचार्य डॉ. हिंमतराव नरके तसेच मराठा विद्या प्रसारक संस्था, नाशिक येथील सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. हा केवळ एका ग्रंथाचा प्रकाशन सोहळा नसून एका व्यासंगी शिक्षकाच्या विचारांचा, अनुभवांचा आणि सर्जनशीलतेचा सोहळा आहे, डॉ. शशिकांत खलाणे यांचे प्रस्तुत पुस्तक मानवी जीवनाच्या समृद्ध वाटचालीस पथदर्शक असल्याचे मत प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांनी व्यक्त केले. जयहिंद शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजेन पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी उच्च शिक्षणात गुणवत्ता निर्माण करण्यासाठी संशोधन कार्याची गरज अधोरेखित करून आजच्या तणावयुक्त वातावरणात वाचनाची गोडी निर्माण करणाऱ्या साहित्याच्या निर्मितीची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी जयहिंद शैक्षणिक ट्रस्टचे जेष्ठ संचालक डॉ. अरुण साळुंखे, संचालिका डॉ. नीलिमा पाटील, प्रमोद पाटील, विश्वजीत देवरे, मोहन मोरे, माजी संचालक प्रा. सुधीर पाटील, प्राचार्य संजय सोनवणे, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. प्रकाश पाठक तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य. डॉ. अविनाश पाटील, उपप्राचार्य डॉ. वर्षा पाटील, उपप्राचार्य डॉ.डी.के.पाटील, प्राध्यापक, विविध महाविद्यालयातील छात्रसेना अधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय प्रथम

## जिल्हाधिकारी रोहन घुगेंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव

प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्र राज्याचे प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शक करण्याच्या हेतूने मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

आज मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित विशेष सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

भारतीय गुणवत्ता परिषदमार्फत करण्यात आलेल्या अत्यंत निकोप व सर्वंकष मूल्यमापनात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने २०० पैकी १८८ गुण प्राप्त केले आहेत. प्रशासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर



करून Ease of Living आणि Ease of Working ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने खालील ७ मुख्य निकषांवर प्रभावी कामगिरी केली. कार्यालयाचे अद्ययावत व वापरकर्त्यांसाठी सुलभ संकेतस्थळ (वेबसाईट), आपले सरकार प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासकीय कामकाजात ई-ऑफीस प्रणालीचा १०० % वापर, कामकाजाच्या प्रभावी देखरेखीसाठी कार्यालयीन डॅशबोर्ड, नागरिकांच्या सुविधेसाठी व्हॉट्सअॅप चॅटबॉट सेवा, शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा नावीन्यपूर्ण वापर, भौगोलिक माहिती प्रणाली तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या उपरोक्त निकषांच्या आधारे जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या कामकाजाचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सदर कार्यक्रमात सविस्तर सादरीकरण केले.

> हे यश जळगाव जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सांघिक प्रयत्नांचे व समन्वयाचे फळ आहे. जिल्हा प्रशासनाचे हे यश समस्त जळगावकर नागरिकांना समर्पित आहे. डिजिटल क्रांतीच्या दिशेने पडलेले हे पाऊल जळगाव जिल्ह्याला विकासाच्या एका नवीन उंचीवर घेऊन जाणारे ठरेल.
>
> – रोहन घुगे,
> जिल्हाधिकारी, जळगाव

# महापालिकेतील रिक्त पदांची भरती करा

## उपमुख्यमंत्री शिंदे यांना उपमहापौर चौधरी यांचे साकडे

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिकेतील रिक्त पदांमुळे कामकाजावर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देत उपमहापौर मनोज चौधरी यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीवेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना तसेच उपमुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन देऊन महापालिकेतील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी करण्यात आली.**

उपमहापौर चौधरी यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, महापालिकेत सध्या साडेआठशे जागा रिक्त असून आगामी काळात मोठ्या प्रमाणात कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे रिक्त पदांमुळे नागरिकांना आवश्यक सेवा पुरविण्यात अडचणी येत असून, निर्णयप्रक्रियेत विलंब होत आहे. जर ही पदे तातडीने भरली गेली नाहीत तर आगामी काळात महापालिकेचे कामकाज अधिकच विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांची भरती तसेच प्रलंबित कर्मचारी भरतीचा बिंदू नामावली मंजूर करून तातडीने भरती प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### असे आहेत रिक्त पदे

वैद्यकीय आरोग्य अधिकारी- १, मुख्य अग्निशमन अधिकारी-१, लेखाधिकारी-१, उपमुख्य लेखापरीक्षक- १, शहर अभियंता १, सहाय्यक मूल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी-१, सहाय्यक संचालक नगर रचना-१, जीवशास्त्रवेत्ता-पशु शल्य चिकित्सक-१, सहाय्यक आयुक्त-७ अशी विविध पदांचा समावेश आहे.

## थोडक्यात

### चैत्र नवरात्रीनिमित्त कुमारी पूजन

**फैजपूर ।** शहरातील जागृत खंडोबा देवस्थानात परंपरेनुसार दरवर्षीप्रमाणे शुक्रवारी संध्याकाळी खंडोबा देवस्थानात चैत्र नवरात्रीनिमित्त कुमारिका पूजन महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्याहस्ते करण्यात आले. भारतीय परंपरेनुसार चैत्र नवमी नवरात्रोत्सव साजरा करण्यात येतो. कन्या ही दुर्गेचे रूप आहे. यावेळी कन्यांचे पूजन करण्यात आले. यावेळी महामंडलेश्वर पवन दास महाराज, प्रवीण दास महाराज, कन्हैया प्रभू इस्कॉन, स्वामी स्वयंमप्रकाशदास, स्वामी अनंत प्रकाश दास, स्वामी भक्ती प्रिय दास, नगराध्यक्ष दामिनी सराफ, उपनगराध्यक्ष निकिता कोळी, पाणीपुरवठा सभापती जयश्री चौधरी, महिला बालकल्याण सभापती दिपाली भारंबे, नगरसेविका सुनीता नेहेते, नगरसेविका नीलिमा महाजन, नगरसेवक पप्पू चौधरी, पवन सराफ, अनंत नेहेते, नरेंद्र चौधरी, राजू महाजन, भक्तगणांची उपस्थिती होती.

# संघटन बळकटीसाठी प्रयत्न करा : गजानन राणे

## मनसेच्या जळगाव जिल्हा बैठकीत कार्यकर्त्यांना आवाहन



प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्ष गजानन राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेली जिल्हा बैठक उत्साहात व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. आगामी काळात पक्ष अधिक मजबूत करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.**

या बैठकीस संपूर्ण जळगाव जिल्ह्यातील तालुका, शहर व ग्रामीण भागातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान पक्ष संघटन, सभासद नोंदणी, स्थानिक प्रश्न तसेच आगामी निवडणुकांच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना गजानन राणे यांनी सकारात्मक व स्पष्ट उत्तरे देत पुढील कामकाजाची दिशा दिली. यावेळी त्यांनी येणाऱ्या काळात मनसेचे संघटन तळागाळापर्यंत मजबूत करण्यावर भर देत सभासद नोंदणी मोठ्या प्रमाणात राबवावी, असे आवाहन केले. तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका लढविण्याच्या दृष्टीने इच्छुक उमेदवार व स्थानिक तयारीबाबतचे सविस्तर अहवाल तातडीने संपर्क अध्यक्षांकडे सादर करावेत, असे निर्देश दिले. दि. २९ मार्च रोजी गजानन राणे हे भुसावळ, रावेर, यावल आणि चोपडा विधानसभा मतदारसंघात दौरा करून ग्रामीण भागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहेत. बैठक संपल्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे उपजिल्हाप्रमुख भाऊसाहेब सोनवणे यांनी विश्रामगृहात येऊन गजानन राणे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष अॅड जमील देशपांडे, जिल्हाध्यक्ष मुकुंदा रोटे, उपजिल्हाध्यक्ष विनोद पाठक. संजय नन्नवरे, एरंडोल तालुका अध्यक्ष विशाल सोनार, जामनेर तालुकाध्यक्ष अशोक पाटील, जळगाव शहराध्यक्ष विनोद शिंदे, किरण तळले,जळगाव उपशहर अध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, प्रकाश जोशी, चेतन पवार, विभाग अध्यक्ष उमेश आठरे, विशाल जाधव,शाखाध्यक्ष अशोक खाटीक, खुशाल ठाकूर, राहुल चव्हाण, ऐश्वर्या श्रीरामे, साजन पाटील, दीपक राठोड, प्रकाश झोपे, जितेंद्र पाटील, संदीप मांडोळे, प्रदीप पाटील, हर्षल वाणी उपस्थित होते.

### आमखेडा गटात विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

प्रतिनिधी । सोयगाव

तालुक्यातील विविध स्पर्धामध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आमखेडा गटाच्या जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हास्तरीय इस्रो सहल परीक्षेत सोयगाव येथील क्रांती गावडे हिचा तसेच तिचे पालक निलेश गावडे यांचा विशेष गौरव करण्यात आला.

# आज विशाल हिंदू मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**जाती-जातीत विखुरलेल्या हिंदू समाजाला संघटित करण्याच्या उद्देशाने जळगाव शहरात दि. २९ मार्च रोजी एका भव्य विशाल हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

सकल हिंदू समाज, श्रद्धा कॉलनी परिसरातील विविध सोसायट्यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून रा. स्व. संघाचे जळगाव जिल्हा सहप्रचार प्रमुख मनोज सावंत हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच ह.भ.प.विलास महाराज सायगावकर यांचे आशिर्वचन यावेळी लाभणार आहे.

रामानंदनगर परिसरातील चर्च रोड जळगाव येथील श्री गणेश मंदिर परिसर, गजानन सोसायटी परिसर, पारिजात संकुल जवळ येथे हा मेळावा रविवार, दि.२९ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता सुरू होईल. या मेळाव्याचे आयोजन सकल हिंदू समाज, श्रद्धा कॉलनी, गजानन सोसायटी, पार्वती नगर, रामानंद नगर परिसराच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# धडक दिल्याचा जाब विचारल्याने तरुणास रॉडने मारहाण

## धरणगाव पोलिस ठाण्यात प्राचार्य लांडगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**कारने दुचाकीला धडक दिली. याविषयी जाब विचारल्याने स्वप्निल दत्तात्रय निकम (३८, रा. वाटिका आश्रमजवळ) यांना प्राचार्य अमोल लांडगे (रा. शिवकॉलनी) यांनी स्टीलच्या रॉडने मारहाण केली. ही घटना १८ मार्च रोजी बांभोरी प्र.चा. येथे घडली. या प्रकरणी धरणगाव पोलिस ठाण्यात प्राचार्य अमोल लांडगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत माहिती अशी की, स्वप्निल दत्तात्रय निकम हे आपल्या कुटंबासह वाटिका आश्रमजवळ राहत असून सन २०१८ पासून एस.एस.बी.टी.कॉलेज बांभोरी येथे खाजगी नोकरी करीत होतो. सन २०२४ या वर्षी एस.एस.बी.टी.कॉलेज बांभोरी येथील प्राचार्यांशी वाद झाल्याने त्यांच्या मानसिक त्रासाला कंटाळून मी एसएसबीटी कॉलेज येथील नोकरी सोडली आहे. त्यानंतर देखील त्यांनी मला वारंवार धमक्या देवून त्रास दिला आहे. तेव्हापासून माझे व एसएसबीटी कॉलेजचे प्राचार्य यांच्याशी माझा वाद सुरू आहे. १८ मार्च रोजी संध्याकाळी ५.४५ वाजेच्या सुमारास मी मोटारसायकलने जेवणासाठी पाळधी रोडने हॉटेलवर जात असतांना बांभोरी स्टॅण्डजवळ प्राचार्य अमोल लांडगे रा. शिवकॉलनी हे त्यांच्या कारने एसएसबीटी कॉलेजकडून बांभोरीकडे येत असतांना त्यांनी माझ्या मोटारसायकल क्र. एमएच १९ ए.एस ३५६० यास समोरून धडक दिली. म्हणून मी त्यांना विचारणा केली असता प्राचार्य अमोल लांडगे यांनी गाडीखाली उतरुण माझ्याशी वाद घालत शिवीगाळ केली व लोखंडी रॉडने मारहाण केली. स्वप्निल निकम यांच्या फिर्यादीवरुन धरणगाव पोस्टेला गुन्हा दाखल झाला आहे.

# आयएमए जळगाव शाखेतर्फे दीडशे रुग्णांची आरोग्य तपासणी

प्रतिनिधी । जळगाव

**आयएमए जळगाव शाखेतर्फे रोझोदा येथील कामसिद्ध मंदिर येथे झालेल्या शिबिरात दीडशे रुग्णांची तपासणी व मोफत औषधी वितरण करण्यात आले.**

या प्रसंगी आयएमएचे अध्यक्ष डॉ. शशिकांत गाजरे, मानद सचिव डॉ.भरत बोरोले, आओ गाव चले टीमचे चेअरमन डॉ. तुषार बेंडाळे, सेक्रेटरी डॉ. निलेश चांडक, रोझोदा येथील अध्यक्ष विजय महाजन, उपाध्यक्ष टेमुदास फेगडे, सचिव वसंत बोंडे यांची उपस्थिती होती. या महाआरोग्य शिबिरात आरोग्य विषयक जनजागृती व मार्गदर्शन आणि गरजू रुग्णांना विनामूल्य औषधी वितरण करण्यात आले. रुग्णांची तपासणी डॉ. विनोद बाविस्कर डॉ. धनंजय बोरोले, डॉ. सुनील पाटील, डॉ. पंकज पाटील, डॉ. नीलम पाटील, डॉ. प्रियंका चौधरी, डॉ. शौनक पाटील, डॉ. गिरीश नारखेडे, डॉ. तेजस पाटील, डॉ. नीरज चौधरी या तज्ञ डॉक्टरांनी रुग्ण तपासणी केली.

# डॉ. पानतावणे साहित्यिकांची नवीपिढी निर्मितीचे शिल्पकार-मुकुंद सपकाळे

प्रतिनिधी । जळगाव



समाजातल्या उपेक्षित वंचित घटकाचे जगणे त्यांचे जीवन आपल्या साहित्यातून, आपल्या विचारातून आंबेडकरी जाणीवेतून मांडत जाणारे, लिहित जाणारे साहित्यिक आपल्या साहित्यातून व्यक्त होत असताना अशा साहित्यिकांना अस्मितादर्शच्या माध्यमातून देशासमोर आणि समाजासमोर आणणाऱ्या डॉ. गंगाधर पाणतावणे यांनी प्रस्थापित साहित्यवर वचक निर्माण करत आपल्या वास्तवदर्शी साहित्याची दखल घेण्यास भाग पाडले असे मत महाराष्ट्र जनक्रांती मोर्चाचे अध्यक्ष मुकुंद सपकाळे यांनी केले.

अस्मितादर्शकार डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. प्रमुख अतिथी जयसिंग वाघ यांनी डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या अस्मितादर्श परिवाराचा गोतावळा हा साऱ्या देशभर साहित्याच्या माध्यमातून पसरलेला आहे. त्यांच्या साहित्यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाचे अनेक पैलू त्यांनी उलगडत नव्या पिढीला अस्मितादर्श संमेलनाच्या माध्यमातून दिशा देण्याचे, लिखाणाला प्रवृत्त करण्याचे कार्य करत अनेक साहित्यिक घडविण्याचे योगदान असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांनी केले. सूत्रसंचालन बापुराव पानपाटील तर आभार युवराज माळी यांनी मानले.

# वाचनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाढते सर्जनशीलता : डॉ. नारखेडे




प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित करणे व त्यांना ताणतणाव मुक्त आणि आनंददायी वातावरणात शिक्षण देणे या उद्देशाने आनंददायी शनिवार साजरा करण्यात आला. हसत- खेळत वातावरणामध्ये एखाद्या कृतीच्या माध्यमातून काहीतरी नाविन्यपूर्ण गोष्ट शिकण्यासाठी शनिवारच्या दिवशी बहिणाबाई विद्यालयात हा उपक्रम राबविण्यात आला.**

कथा, कविता, ललित पुस्तके, छोट्या गोष्टींची पुस्तके, गणित, विज्ञान, खेळ विषयाची शिक्षणाशी संबंधित पुस्तके यामुळे रोवला गेलेला ग्रंथालयाचा पाया आपल्या लेखणीतून अख्या भारताला उत्तुंग स्वप्न पाहण्याचे बळ देणाऱ्या भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे व शिक्षकांनी हा वाचन कट्टा निर्माण केलेला आहे. वाचनामध्ये आयुष्य बदलण्याचे सामर्थ्य असल्याचा संदेश डॉ विलास नारखेडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना देऊन वाचन हे विद्यार्थी, माणसे यासोबत देशाला घडवते. मुख्याध्यापक डॉ. नारखेडे यांच्या प्रेरणेतून साकार झालेला आणि विद्यार्थी आणि शिक्षक यांना जोडणारा दुवा म्हणजे वाचन कट्टा .विद्यार्थ्यांना अभ्यास, करियर या विषयाच्या विविध प्रकारच्या शंका या ठिकाणी सोडवता येतात, विषय शिक्षक संबंधित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करते असे वाचन कट्टा बनवण्याचा उद्देश आहे. या वाचन कट्ट्यात विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी लेखन, व्यवसायिक लेखन, ई-बुक, हस्तलिखिते, शॉर्ट फिल्म डॉक्युमेंटरी, विविध प्रकारचे लेखन अशा निरनिराळे प्रकारचे साहित्य ठेवण्यात आलेले आहे. या उपक्रमात समन्वयिका प्रतिभा खडके, अजय कुवर, सीमा चौधरी, राजेश वाणी, विशाल पाटील, महेंद्र पाटील, संतोष सोनार, डी.एस.चौधरी व विद्यार्थी मित्रांनी सहभाग नोंदवला.

# वनसंपदा संवर्धनाची जबाबदारी तरुण पिढीने स्वीकारावी

## जैवविविधता महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी धुळे सर्कलच्या मुख्य वनसंरक्षक नीनू सोमराज यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

आजच्या तरूण पिढीने सातपुडा व सह्याद्रीच्या परिसरातील वनसंपदेचे रक्षक व्हावे व या वनसंपदेच्या संवर्धन व संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित आदिवासी अकादमी, नंदुरबार आणि पर्यावरण विज्ञान आणि निसर्ग संवर्धन शाळा, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७ मार्च रोजी व्दिदिवसीय जैवविविधता महोत्सव - २०२६ चे उद्घाटन करतांना धुळे सर्कलच्या मुख्य वनसंरक्षक नीनू सोमराज यांनी केले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी, यावल येथील उपवनसंरक्षक सौरीष सहाय, जुही पेठे (प्रोजेक्ट हेड, रिसर्च इन एन्व्हायर्नमेंट, एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट सोसायटी,




नाशिक), राज्यपाल नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य व नियोजन समिती अध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, कार्यकारी अध्यक्ष नितीन झाल्टे, महोत्सवा समन्वयक प्रा. के.एफ.पवार हे उपस्थित होते. पुढे बोलतांना नीनू सोमराज यांनी सांगितले की, झाडे लावणे, वनांचे संरक्षण व संवर्धन करणे हे केवळ पृथ्वी वाचवण्यासाठी नसून मानवांच्या अस्तीत्वासाठी आवश्यक आहेत. त्याकरीता सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. वनसंपदेकडून मानवाला आरोग्य तर मिळतेच मात्र दुर्मिळ वनसंपदा, सुक्ष्म बॅक्टीरीया, बीज या पासून उत्पन्न देखील मिळते. आजची पिढी जरी एआय मधील असली तरी कोणतेही तंत्रज्ञान झाडांची झटपट वाढ करू शकत नाही. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, मानव जंगले कमी करत असल्यामुळे जंगलातील जैव विविधता उदा. टि्या वगैरे प्राणी गाववस्तीकडे येत आहे. त्यामुळे वनांचे संरक्षण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरू प्रा. व्ही.एल माहेश्वरी यांनी सांगितले की, मानवाचे अस्तित्व वन जंगलांवर अवलंबून आहे. यांच्यापासून अन्न, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होत आहेत. आजच्या पिढीने प्लॅस्टीकचा वापर कमी करून जैवविविधता व वनसंपदेचे संरक्षण करावे. असे सांगून विद्यापीठाने विद्यार्थ्याकरीता वनसंवर्धनासाठी पुढाकार घेणे संधी योजनांचा तपशील सांगितला. प्रास्ताविक करतांना व्य.प.सदस्य राजु नन्नवरे यांनी सातपुडा-खानदेश प्रदेशातील समृद्ध जैवविविधता, आदिवासी समाजाचे पारंपरिक पर्यावरणीय ज्ञान आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध अधोरेखित केले व जैवविविधतेचे संवर्धन व संरक्षण आवश्यक असल्याचे सांगितले. सुरुवातीस सातपुडा व खानदेशातील जैवविविधतेवरील प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन खेमराज पाटील यांनी तर आभार प्रा. के.एफ. पवार यांनी मानले.

# पाणीट्टी थकबाकीदारांवर नळ कटची टांगती तलवार

## अनधिकृत नळधारकांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार!

प्रतिनिधी । चोपडा




**चोपडा शहराच्या पाणीपुरवठा योजनेचा वाढता खर्च आणि घटलेली वसुली यामुळे नगरपरिषद प्रशासनाने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी वर्षाकाठी सुमारे ५ कोटी रुपये खर्च होत असताना, प्रत्यक्ष ३१ मार्चअखेर वसुली मात्र केवळ २.१ कोटींच्या घरात आहे. या आर्थिक तफावतीमुळे पाणीपुरवठा व्यवस्था संकटात सापडली असून मुख्याधिकाऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी पाणीपट्टी न भरणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.**

नगरपरिषदेच्या सन २०२५-२६ च्या विवरणपत्रानुसार वीज बिल, रसायने, देखभाल-दुरुस्ती आणि कर्मचारी वेतनावर मोठा खर्च होत आहे. मात्र, अनेक नागरिकांनी गेल्या ५ ते १० वर्षांपासून पाणीपट्टी भरलेली नाही. खर्चाच्या तुलनेत उत्पन्न निम्मेच असल्याने प्रशासनावर मोठा ताण येत आहे. एप्रिल-मे महिन्यात धडक मोहीम प्रशासनाने राबवून आता कारवाईचा बडगा उगारण्याचे निश्चित केले असून ज्यांनी विनापरवाना नळ कनेक्शन घेतले आहे, त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील आणि ४० ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल. तसेच मोठ्या थकबाकीदारांच्या नळ जोडण्या तोडून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी एप्रिल आणि मे महिन्यात विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.

### विकासकामांना खीळ

कमी वसुलीमुळे केवळ पाणीपुरवठाच नव्हे, तर शहराच्या एकूण विकासकामांवर परिणाम होत आहे. नगरपरिषद संचालनालय (मुंबई) आणि जिल्हाधिकारी (जळगाव) यांच्याकडून वसुली वाढवण्यासाठी मोठा दबाव आहे.

वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास वित्त आयोगाचा निधी कमी होणार आहे. ज्याचा परिणाम रस्ते, स्वच्छता आणि नागरी सुविधांवर होईल. यामुळे, कामात कसूर करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवरही कारवाई प्रस्तावित आहे.

### थकित पाणीपट्टीमुळे शहराच्या प्रगतीत अडथळा, थकबाकी त्वरित भरा : मुख्याधिकारी




शहराचा पाणीपुरवठा अखंडित ठेवणे ही नगरपरिषदेची जबाबदारी असली, तरी त्यासाठी लागणारा खर्च हा पाणीपट्टी वासुलीतूनच भागवला जातो. थकीत पाणीपट्टीमुळे शहराच्या प्रगतीत अडथळा निर्माण होत आहे. तरी सर्व नागरिकांनी ३१ मार्चपर्यंत आपली संपूर्ण थकबाकी भरून प्रशासनाला सहकार्य करावे; अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी माहिती मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी दिली आहे.

# कर थकवणाऱ्या मोबाईल टॉवरधारकांना वरणगाव नगरपरिषदेच्या नोटिसा

## सात ठिकाणी टॉवर, थकबाकी वसुलीची कारवाई सुरू

प्रतिनिधी । वरणगाव

**शहरातील मोबाईल टॉवरवरील कर थकबाकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून नगरपरिषद प्रशासनाने कर न भरलेल्या काही टॉवरधारकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.**



नगरपरिषदेच्या कर आकारणी असलेल्या जागांवर उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरचा कर अनेक महिन्यांपासून न भरल्याचे समोर आल्याने संबंधित मालकांना प्रशासनाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. शहरातील विविध भागांमध्ये सुमारे सात ठिकाणी वेगवेगळ्या दूरसंचार कंपन्यांचे मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहेत. या टॉवरसाठी अनेकांनी आपल्या घरांच्या छतावर किंवा मोकळ्या जागांवर जागा उपलब्ध करून दिली आहे. मोबाईल कंपन्यांकडून संबंधित जागाधारकांना दरमहा भाडे मिळत असले तरी नगरपरिषदेला देय असलेला कर काही ठिकाणी नियमितपणे भरला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

नगरपरिषद प्रशासनाच्या प्राथमिक तपासणीत काही टॉवरधारकांनी गेल्या अनेक महिन्यांपासून कर भरलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकारामुळे नगरपरिषदेच्या महसुलातही घट होत असल्याची बाब समोर आली आहे. यापूर्वी या प्रकरणाकडे प्रशासनाचे काही प्रमाणात दुर्लक्ष झाले होते; मात्र आता याबाबत गंभीर दखल घेण्यात आली आहे. ज्या घरांवर किंवा जागांवर मोबाईल टॉवर बसविण्यात आले आहेत आणि ज्यांच्याकडून कर थकवण्यात आला आहे अशा मालकांना नोटिसा पाठवून थकबाकी तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नगरपरिषदेकडून देण्यात आलेल्या मुदतीत थकबाकी भरली नाही तर संबंधितांवर दंडात्मक कारवाई, दंड आकारणी तसेच पुढील कायदेशीर पावले उचलण्यात येतील, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. दरम्यान, शहरातील सर्व मोबाईल टॉवरची संपूर्ण माहिती गोळा करण्याचे कामही प्रशासनाने सुरू केले आहे. कोणत्या भागात किती टॉवर आहेत, त्यांची कर आकारणी किती आहे आणि किती कर थकबाकी आहे याचा तपशील तयार केला जात आहे. भविष्यात अशा प्रकारे कर थकवण्याच्या घटना टाळण्यासाठी नियमित तपासणी आणि कडक वसुली मोहीम राबविण्याचा विचार नगरपरिषद प्रशासन करत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या कारवाईमुळे काही कर थकवणाऱ्या टॉवरधारकांमध्ये खळबळ उडाली असून येत्या काही दिवसांत थकबाकी वसुलीला वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### सहाय्यक प्राध्यापक चंदू कोळी यांना पीएचडी प्रदान



चोपडा । SVKM NMIMS ग्लोबल युनिव्हर्सिटी, धुळे येथील सहाय्यक प्राध्यापक श्री चंदू कोळी यांना गणित विषयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. स्टडी ऑफ हिट अँड मास ट्रान्सफर इफेक्ट ऑन MHD कॉन्वेक्टिव फ्लो या विषयावर त्यांनी संशोधन प्रबंध सादर केला. या संशोधनासाठी राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा येथील गणित विभागप्रमुख प्रा. डॉ. शांताराम साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. श्री कोळी यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल SVKM NMIMS युनिव्हर्सिटीचे डीन डॉ. निलेश साळुंके, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील, KBCNMU गणित विभागाचे संचालक डॉ. किशोर पवार, प्राध्यापक वृंद व विरवाडे ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ते विद्याभारती माध्यमिक विद्यालय विरवाडे येथील शिक्षक विलास कोळी यांचे मोठे भाऊ आणि माजी जि.प.सदस्य राजू कोळी यांचे भाचे आहेत.

# उमेश पाटील याचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी । चोपडा

**गणपुर येथील उमेश(ओम) रवींद्र पाटील या चौदा वर्षीय शाळकरी मुलाने अनेर नदीत बुडणाऱ्या चार मुलांचे प्राण वाचवल्याबद्दल त्याचा मान्यवरांकडून सत्कार करीत त्याच्या शौर्याचे कौतुक होत आहे. विधान सभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांनी त्याच्या घरी येऊन सत्कार करून बक्षीस देत त्याच्या धाडसाचे कौतुक केले.**



यावेळी शशिकांत पाटील, अॅड. बाळकृष्ण पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष उमेश नेमाडे यांनीही त्याच्या कार्याची दखल घेत त्याचा गणपूर येथे सत्कार केला. त्यावेळी धानोऱ्याचे रवि चौधरी, घोडगावचे उपसरपंच किशोर दुसाने, दीपक वानखेडे, हर्षल करंदीकर, विनोद पाटील डॉ किरण पाटील, प्रवीण पाटील, गणेश पाटील व ओमचे वडील रवींद्र साहेबराव पाटील आदी उपस्थित होते.

# खेळा, गमती करा पण अभ्यास करायला विसरू नका : राजेंद्र बावस्कर

प्रतिनिधी । वरणगाव

**बालवयात शरीर बळकट होण्यासाठी मुलांनी मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे. विटीदांडू, लंगडी, कबड्डी यांसारखे पारंपरिक खेळ खेळून शारीरिक विकास साधावा. खेळ आणि आनंद यांसोबतच अभ्यासाकडेही तितकेच लक्ष देणे आवश्यक आहे. मोबाईलपासून दूर राहून अभ्यास केल्यासच भविष्यात परिस्थिती सुधारेल, असे प्रतिपादन दीपनगर औष्णिक विद्युत प्रकल्पाचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता राजेंद्र बावस्कर यांनी केले.**




राधाकृष्ण श्री संत शिरोमणी गुरु रविदास सेवा ट्रस्ट, काहूरखेडे (ता. भुसावळ) यांच्या वतीने सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त, संत,महंत, समाजसुधारक व शास्त्रज्ञ यांच्या जीवनकार्यावर आधारित शालेय विद्यार्थ्यांना पुस्तक व खाऊ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम ओझरखेडे तालुका भुसावळ येथील जिल्हा परिषद शाळेत पार पडला. कार्यक्रमास एपीजे अब्दुल कलाम नॅशनल कौन्सिल ऑफ यंग सायंटिस्टचे चेअरमन सुनील वानखेडे, ट्रस्टचे अध्यक्ष चावदस सपकाळे, सदस्य स्वप्निल बावस्कर, रामा सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश निळे आदी उपस्थित होते. यावेळी सुनील वानखेडे यांनी शब्दसंपत्ती व ज्ञान वाढवण्यासाठी पुस्तकांचे व वर्तमानपत्रांचे वाचन अत्यंत आवश्यक आहे. मोबाईलवरील सोशल मीडियामुळे वेळ वाया जातो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहण्याचा सल्ला त्यांनी दिला. सूत्रसंचालन सूर्यकांत घुले यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनिता जुमडे यांनी मानले.

# दीपनगर प्रशासनाविरोधात जाडगाव पेटलं!

## रोजगाराच्या मागणीसाठी युवकांचे आमरण उपोषण सुरू

प्रतिनिधी । वरणगाव ता भुसावळ

**तालुक्यातील जाडगाव येथे स्थानिक युवकांचा संताप उफाळून आला असून, रोजगाराच्या प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ आजपासून बुष्टर पंप परिसरात आमरण उपोषणाला सुरुवात झाली आहे. दिपनगर प्रशासनाने दिलेले आश्वासन पाळले नसल्याने युवकांनी पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.**



या आंदोलनाचे नेतृत्व सरपंच निखिल शांताराम सुरवाडे करत असून, त्यांच्यासह प्रमोद पाटील, मयूर सोनवणे, पराग बोंडे, किरण सोनवणे, अश्विन धांडे, प्रवेश नन्नवरे, राहुल सुरवाडे, पवन डाबेराव, जय पाटील आदींसह अनेक युवक उपोषणात सहभागी झाले आहेत.

दि.१७ मार्च २०२५ रोजी याच ठिकाणी युवकांनी बेमुदत उपोषण छेडले होते. त्यानंतर दि. २९ मार्च २०२५ रोजी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते आंदोलन मागे घेण्यात आले. त्यावेळी दीपनगर प्रकल्प प्रशासनाने जाडगावातील बेरोजगार युवकांना रोजगार देण्याचे ठोस आश्वासन दिले होते. मात्र, आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, १५ युवकांना नोकरी देण्याचे आश्वासन देऊनही प्रत्यक्षात फक्त ५ जणांनाच कामावर घेतले गेले. उर्वरित १० युवकांना अजूनही संधी मिळालेली नाही, त्यामुळे प्रशासनाविरोधात संताप वाढला आहे.स्थानिक युवकांना रोजगार नाकारून बाहेरील तालुक्यातील लोकांना कामावर घेतले जात असल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे. आम्ही प्रकल्पग्रस्त असूनही आम्हाला न्याय मिळत नाही, अशी भावना युवकांनी व्यक्त केली.

# तात्यासाहेब आर. ओ. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी । पाचोरा

**निर्मल इंटरनॅशनल स्कूल येथे तात्यासाहेब आर.ओ. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.**



सन २०११ साली तात्यासाहेब आर.ओ.पाटील यांनी निर्मल इंटरनॅशनल स्कूल या रूपाने एक छोटेसे रोपटे रोवले आणि आज तेच रोपटे वटवृक्ष बनून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य उजळवत आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणातच नव्हे तर जीवनातही यशस्वी व्हावे, ते कुशल डॉक्टर, अभियंते, अधिकारी बनून देशाचे सुजाण नागरिक व्हावेत हा त्यांचा दूरदृष्टीचा विचार आजही प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशातून जिवंत आहे. आज ही शिक्षणसंस्था केवळ शाळा नसून, स्वप्नांना पंख देणारी एक प्रेरणादायी पंढरी बनली आहे. येथे घडणारा प्रत्येक विद्यार्थी हा तात्यासाहेबांच्या विचारांचा जिवंत वारसा आहे. दि.२८ मार्च त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त तात्यासाहेबांच्या पावन स्मृतिस्थानी शाळेच्या अध्यक्षा वैशालीताई सुर्यवंशी, सचिव नरेंद्रसिंग सुर्यवंशी, प्राचार्य गणेश राजपूत, जनसंपर्क अधिकारी आय.बी.सिंग, उपप्राचार्य प्रदिप सोनवणे, समन्वयक स्नेहल पाटील तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

# फुलगावातील दस्तक ड्रॉप इन इंधन केंद्र सील; सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन उघड

प्रतिनिधी । वरणगाव ता भुसावळ

तालुक्यातील फुलगाव शिवार परिसरात असलेल्या हॉटेल वेस्टर्न समोरील दस्तक ड्रॉप इन या इंधन विक्री केंद्राबाबत भुसावळ तहसिल कार्यालयात तक्रार करण्यात आली होती त्या अनुषगांने तहसीलदार, यांच्या आदेशानुसार दि २५ बुधवार रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास शासकीय पथकाद्वारे सदर केंद्राची आकस्मिक तपासणी करण्यात आली.

सदर तपासणी मोहिमेत श्रीमती रोशना रेवतकर (पुरवठा निरीक्षण अधिकारी, भुसावळ) आणि सुरज चव्हाण (सेल ऑफिसर, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड) यांचा समावेश होता. तपासणी दरम्यान केंद्राचे मालक व कंपनी प्रतिनिधी म्हणून नोडे इकबाल अली मोहम्मद (रा. कच्छ) व शेख रियाज शेख मासूम (रा. खडका रोड, भुसावळ) यांच्याकडे विचारणा केली असता, खालीलप्रमाणे गंभीर त्रुटी व नियमबाह्य बाबी आढळून आल्या आहेत.

अधिकृत परवान्याचा अभाव: मालक व प्रतिनिधींकडे आउटलेट चालवण्यासाठी आवश्यक असलेले शासनाचे कोणतेही वैध परवाने किंवा अधिकृत परवानगी पत्रे मागणी करूनही सादर करण्यात आली नाहीत. धोकादायक साठवणूक: इंधन साठवण्यासाठी आवश्यक असलेली सुरक्षा मानके पाळली जात नसल्याचे आणि अत्यंत धोकादायक पद्धतीने ज्वलनशील पदार्थांची साठवणूक केल्याचे दिसून आले. पेट्रोलियम परवाना देखील उपलब्ध नव्हता. वजन व मापे नियमांचे उल्लंघन: केंद्रावरील नोझलची शेवटची तपासणी (कॅलिब्रेशन) सन २०२० मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर त्याचे नूतनीकरण केलेले नाही. वजन व मापे विभागाचे कोणतेही वैध प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही. इंधन गुणवत्ता व लॅब टेस्टिंग: वाहनांना डिझेल म्हणून विकल्या जाणाऱ्या इंधनाचा नेमका प्रकार आणि त्याच्या गुणवत्तेबाबत कोणत्याही अधिकृत प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र संबंधितांकडे मिळून आले नाही.

कागदपत्रांची कमतरता: इंधन खरेदी-विक्री आणि ज्वलनशील पदार्थ साठवणुकीबाबतची कोणतीही अधिकृत कागदपत्रे संबंधितांकडे आढळून आली नाहीत. वरील सर्व बाबी सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आणि धोकादायक असल्याने, सदर पंप तात्काळ सील करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा सविस्तर अहवाल माननीय जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित विभागाकडे पुढील कडक कायदेशीर कारवाईसाठी सादर करण्यात येत आहे.

तहसीलदार कार्यालय,
भुसावळ.

# चोपडा शहरात रन फॉर अजितदादा सदभावना रॅली

## ● शाळेतील मुलांसह विविध घटकातील सुजाण नागरिकांचा सहभाग; अजितदादांना अभिवादन

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी घटनेस आज दोन महिने झाले. त्याअनुषंगाने स्मृति अभिवादनानिमित्त चोपडा शहरातून रन फॉर अजित दादा ह्या सदभावना रॅलीचे आयोजन सुनिल पाटील (वाळकी, चोपडा) ह्यांच्या संकल्पनेतून करण्यात आली होती.**




याप्रसंगी माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराती, माजी आमदार कैलास पाटील, माजी आमदार दिलीपराव सोनवणे, चोसाका माजी चेअरमन घनः श्याम पाटील, चोपडा पीपल्स बँक चेअरमन चंद्रहास गुजराती, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे, नगरसेवक प्रवीण देशमुख, नगरसेवक नरेंद्र पाटील, नगरसेवक दीपक पाटील, नगरसेवक अमोल पाटील, रानू देशमुख, ईम्रान बागवान, तालुकाध्यक्ष विजय पाटील, शशिकांत पाटील, राष्ट्रवादी कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील, युवती जिल्हाध्यक्ष मोनाली पवार, संजय कानडे, नोमान काझी, शाम परदेशी,प्रफुल्ल स्वामी, जमील कुरेशी, राकेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या रॅलीमध्ये विविध शाळेतील मुले व विविध घटकातील सुजाण नागरिकांनी देखील सहभाग घेतला होता.

# प्लास्टिक बंदीसाठी मनसेकडून भुसावळ पालिकेला निवेदन

प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ पालिका प्रशासनाने १२० मायक्रॉनपेक्षा कमी प्लास्टिक उत्पादन, विक्री व वापर करणाऱ्यांवर तत्काळ कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.**

पर्यावरण रक्षणाच्या उद्देशाने भारत सरकारने १ जुलै २०२२ पासून सिंगल-यूज प्लास्टिकवर पूर्ण बंदी घातली आहे. यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, ग्लास, पाण्याच्या बाटल्या, कप, प्लेटसह १२० मायक्रॉनपेक्षा कमी प्लास्टिक कॅरीबॅगसारख्या वस्तूंचा वापर, विक्री आणि उत्पादन पूर्णपणे प्रतिबंधित आहे. तरीही भुसावळ शहरात या वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे पाहायला मिळते. भाजी, फळ, किराणा, मांस विक्री आणि अन्य ठिकाणी प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर सर्रास सुरू आहे. यामुळे शहरातील नाले आणि गटार तुंबतात, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते, तसेच प्राणी व पक्ष्यांचे जीवनही प्रभावित होते. यावर पायबंद घालण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या भुसावळ शहराध्यक्ष दीपक सोनवणे, तालुकाध्यक्ष तुषार वाढे, तालुका सचिव विलास कोळी, तालुका उपाध्यक्ष दशरथ सपकाळे, सुशील मोरे व कार्यकर्त्यांनी उपमुख्याधिकारी परवेज शेख यांना निवेदन सादर केले.